२८ डिसेंबर २०२१ सकाळ

# चीनमुळे जागतिक शांतता नष्ट

## डॉ. शैलेंद्र देवळाणकर; ताराराणी विद्यापीठाच्या स्मरणिकेचे प्रकाशन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २७ : कोरोनासारखी कृत्रिम महामारी निर्माण करून चीन जगाला हादरवू शकतो. साहजिकच जागतिक शांतता नष्ट करण्याची तयारी दिसून येत आहे, असे मत आंतरराष्ट्रीय राजकीय व परराष्ट्रीय धोरणाचे विश्लेषक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी आज येथे व्यक्त केले.

ताराराणी विद्यापीठातर्फे आयोजित क्रांतिवीर रंगराव पाटील व्याख्यानमालेत ते बोलत होते. यावेळी विद्यापीठाच्या अमृतमहोत्सवानिमित्त संस्थेच्या स्मरणिकेचे प्रकाशन झाले. ज्येष्ठ राजकीय विश्लेषक डॉ. अशोक चौसाळकर अध्यक्षस्थानी होते. व्ही. टी. पाटील सभागृहात हे व्याख्यान झाले.



**डॉ. शैलेंद्र देवळाणकर**

डॉ. देवळाणकर म्हणाले, 'लॉकडाउनची स्थिती, देशाची आर्थिक घडी विस्कटणारी मानवनिर्मित व्यवस्था राष्ट्रांनी उभारली आहे. त्यातून गरिबी व बेकारीची भयानकता वाढली आहे. चीन अतिक्रमण करणारा देश आहे. त्यामुळे कोरोनासारखे अनेक व्हायरस भविष्यात जगभरात येत राहतील. त्याला प्रत्येक देशाने सक्षमपणे तोंड द्यावे.'

ते म्हणाले, 'कोरोनाच्या भयंकर संकटाला तोंड देताना चीन व अफगाणिस्तान या शेजारील राष्ट्रांशी भारताने समन्वयाने, सावधगिरीने व विधायक विचाराने संबंध जोपासायला हवेत. आजच्या आर्थिक परिस्थितीत या राष्ट्रांची आर्थिक धोरणे, राजकीय गणिते व इतरांची मुस्कटदाबी करणारी प्रवृत्ती कारणीभूत आहे. त्यामुळे बदलत्या आंतरराष्ट्रीय संबंधांकडे डोळसपणे पाहणे आवश्यक आहे.' अफगाणिस्तान तालिबानी संघटनेचे माहेरघर असून अतिरेकी संघटनांना बळ देणारा देश म्हणून राज्यकारभार करणारे अतिरेकी प्रवृत्तीचे लोक भारतीयांच्या जीवावर उठलेले राज्यक[...] आहेत, असेही त्यांनी सांगितले.

डॉ. आझाद नायकवडी यां[...] क्रांतिवीर रंगराव पाटील यांच्[...] जीवनावर आधारित पोवाडा साद[...] केला. यावेळी ताराराणी विद्यापीठा[...] कार्यकारी अध्यक्ष प्राचार्य ड[...] क्रांतीकुमार पाटील, उपाध्यक्ष ड[...] एस. एन. पवार, सचिव प्राजक[...] पाटील, विश्वस्त कांचनताई पाटील[...] डॉ. सी. आर. गोडसे, जे. एस[...] पाटील, विजय पाटील उपस्थित होते[...] एस. डी. चव्हाण यांनी सूत्रसंचाल[...] केले. पी. आर. मंडलिक यां[...] आभार मानले.